**<u>ठळक बातम्या</u>**

- एसआयआरचा म्हणजे मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू

- महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत २ हजार ३९९ आजारांचा समावेश करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर होण्याची शक्यता

**आणि**

- आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचं विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाचं मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन; स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव यांचा राज्य सरकार रोख पुरस्कार देऊन सन्मान करणार

<><><><><>

निवडणूक आयोगाने आजपासून एसआयआरचा म्हणजे मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू केला. नऊ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून एकंदर ५१ कोटी मतदारांची पडताळणी या मोहिमेत केली जाणार आहे. या मतदारांची पडताळणी करून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. यापूर्वी बिहारमध्ये पडताळणी मोहीम आयोजित करण्यात आली होती. त्यात मतदारांच्या पडताळणीनंतर सात कोटी ४२ लाख मतदारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली होती.

दुसऱ्या टप्प्यात छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, पुदुच्चेरी, राजस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार तसंच लक्षद्वीपमध्ये मतदारांची पडताळणी केली जाणार आहे. यापैकी तमिळनाडू, केरळ, पुदुच्चेरी आणि पश्चिम बंगालमध्ये २०२६मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. आजपासून ४ डिसेंबरपर्यंत मोजणीचा टप्पा असेल. मतदार याद्यांचा पहिला मसुदा ९ डिसेंबरला प्रसिद्ध केला जाईल आणि ७ फेब्रुवारी २०२६ला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. कोणताही पात्र मतदार निवडणूक प्रक्रियेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेणं, तसंच बेकायदा

स्थलांतरितांसह अपात्र मतदारांची नावं वगळणं हा या मोहिमेचा उद्देश असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजना अंतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करायला राज्य मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली आहे. त्यानुसार आता या योजनेत २ हजार ३९९ आजारांचा समावेश केला गेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुंबईत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. आयुष्मान कार्ड तयार करणाऱ्या आणि वितरीत करणाऱ्या आघाडीच्या फळीतल्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करायलाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सुविधांचं विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशानं शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णयही आजच्या बैठकीत झाला. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचं नियमित पदावर समायोजन करण्याच्या निर्णयात दुरुस्ती करायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. याशिवाय पुणे जिल्ह्यात घोडनदी इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय, तसंच वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय, आणि शासकीय अभियोक्ता कार्यालयाची स्थापना, छत्रपती संभाजीनगरमध्ये पैठण इथं वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाची स्थापना करायला, आणि त्यासाठी आवश्यक पदनिर्मितीसाठीही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

भारतीय रिझर्व्ह बँकेनं परवाना नाकारल्यानं महा आर्क लिमीटेड ही राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी बंद करायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे. याशिवाय विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या कर्जाला शासन हमी द्यायला मान्यता, नागपूर मधल्या लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाला २०२५-२०२६ ते सन २०२९-२०३० या कालावधीकरता दरवर्षी ७ कोटी रुपयांचा निधी द्यायला मंजुरी, सोलापूर जिल्ह्यात कुंभारी इथं असंघटित कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत उभारल्या जाणाऱ्या ३० हजार घरांच्या गृहप्रकल्पाला विविध करांमधून सवलत, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचं वेतन देण्यासाठी असलेल्या कर वसुलीच्या अटीत सुधारणा, गुरुतेग बहादूर साहिब जी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी समागम शताब्दी कार्यक्रमाकरता निधी, परशुराम आर्थिक विकास महामंडळ - वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ आणि

श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांनाही आज मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

<><><><>

महाराष्ट्रातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात राज्य निवडणूक आयोग आज पत्रकार परिषद घेणार आहे. मुंबईत आज दुपारी चार वाजता निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे पत्रकार परिषदेला संबोधित करतील. यात स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.

<><><><>

उत्पन्नाचा नवा स्रोत निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य परिवहन महामंडळ राज्यभरात आपल्या मालकीच्या २५०पेक्षा जास्त जागांवर इंधन विक्री सुरू करणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या ठिकाणी व्यावसायिक तत्वावर पेट्रोल, डीझेलबरोबरच सीएनजी तसंच इलेक्ट्रिक चार्जिंग उपलब्ध असतील.

दरम्यान, एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीची थकबाकीची रक्कम देण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. एस टी महामंडळानं आज प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढीची थकबाकी रकमेनुसार पाच ते ४८ हप्त्यांमध्ये प्रदान केली जाणार आहे.

<><><><>

आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचं विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघावर सर्व थरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाचं अभिनंदन केलं आहे. या विश्वविजेत्या संघाला भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं ५१ कोटी रुपयांचं रोख पारितोषिक जाहीर केलं आहे.

भारतीय महिला संघातल्या खेळाडूंच्या प्रतिभेला आणि कामगिरीला साजेसा हा विजय आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. महिला

संघानं संपूर्ण स्पर्धेत आपली सांघिक कामगिरी आणि दृढनिश्चय दाखवत हा ऐतिहासिक विजय मिळवल्याची भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही या संघाचं अभिनंदन केलं आहे. या संघाच्या विजयात योगदान देणाऱ्या महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव या तिघींचा रोख पुरस्कार देऊन सन्मान करायचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

<><><><><>

भारताचं स्टील उत्पादन २०३० पर्यंत ३० कोटी टन तसंच २०४७ पर्यंत ५० कोटी टन करण्याचं उद्दिष्ट असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज सीआयआय स्टील शिखर परिषदेच्या उद्घाटनपर सत्रात स्टील मंत्रालयाचे सचिव संदीप पुंडरीक यांनी ही माहिती दिली. गेल्या दशकभरात भारताचं स्टील उत्पादन दुपटीने वाढलं आहे, पायाभूत सुविधा आणि देशांतर्गत मागणीही वाढली आहे, असं त्यांनी सांगितलं. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत स्टील उद्योग क्षेत्रानं साडेआठ टक्के वाढ नोंदवल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

तंत्रज्ञान, व्यापार आणि आंतरऱाष्ट्रीय तणावाची आधीपेक्षा अधिक वेगानं सरमिसळ होण्याचा हा काळ आहे, असं प्रतिपादन नौदल प्रमुख दिनेश कुमार त्रिपाठी यांनी केलं आहे. ते आज दहाव्या भारतीय संरक्षण परिषदेला संबोधित करत होते. या सरमिसळीमुळे धोरणात्मक बदलही वेगानं होत आहेत. या नव्या परिस्थितीत स्वदेशी आणि स्व-क्षमतेला अधिक महत्त्व प्राप्त झालं आहे, असं त्रिपाठी म्हणाले.

<><><><><>

मुंबई युवक काँग्रेसच्या नवनियुक्त अध्यक्ष झीनत शबरीन आणि पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा मुंबईतल्या यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब उपस्थित होते.

<><><><><>

बुलढाणा जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पाच लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये जिल्हा प्रशासनानं सुमारे ३०० कोटी पेक्षा जास्त मदत निधी जमा केल्याची माहिती जिल्ह्यधिकाऱ्यांनी दिली आहे. याशिवाय, २०२४-२५ मधल्या रखडलेल्या पीक विम्याचे सुमारे १२१ कोटी रुपये ६३ हजारांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले  आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

ज्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात त्रुटी आहेत किंवा ज्यांनी शेतकरी ओळखपत्र काढलेलं नाही अशांना ही नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रशासन काम करत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यातल्या एका यात्रेकरूकडून हज यात्रेला जाण्यासाठी पैसे घेऊन त्याची फसवणूक करणाऱ्या ट्रॅव्हल एजन्सीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.  या एजन्सीनं एका व्यक्तीकडून २० लाख रुपये घेऊन या व्यक्तीला आणि त्याच्या कुटुंबाला हजला नेण्याचं आश्वासन दिलं होतं. मात्र प्रत्यक्षात त्यांना हजला न नेता त्यांची फसवणूक केली. मुंब्रा पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

**//<><><><><>//**